**<u>प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.</u>**

<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण</u>

**<u>सं. फौ. ख. क्र. २८४८/२०१८.</u>**
**<u>निशाणी : ३.</u>**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याची तारीख | : | १५/१०/२०१८. |
| २. फिर्याद दाखल तारीख | : | १५/१०/२०१८. |
| ३. फिर्यादीचे नांव | : | श्री. व्ही. टी. जोगदंड,<br>आर.पी.एफ. दौंड. |
| ४. आरोपीचे नांव | : | रविंद्र रमनलाल बोरा, वय ४२ वर्षे,<br>रा. मोरगे वस्ती, श्रीरामपूर, जि. अहमदनगर. |
| ५. गुन्हा कलम | : | कलम १५५ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९. |

**<u>अपराधाचे विवरण –</u>**

दिनांक १५/१०/२०१८ रोजी सकाळी ६.०० वाजता तुम्ही गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून प्रवास करीत असतांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १५५ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**– <u>आरोपीचे प्रतिकथन</u> –**

प्र. १ : तुम्हांला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हांला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हांला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

आरोपीची सही..............................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : १५/१०/२०१८.**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :

माझे नांव : श्री. बी. पी. मीना,
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहण्याचे ठिकाण : दौंड.

**सरतपास सहा. सरकारी वकील श्री. एस. बी. पांडे यांच्यामार्फत**

१. दिनांक १५/१०/२०१८ रोजी फिर्यादी श्री. व्ही. टी. जोगदंड, आर.पी. एफ. दौंड यांनी फिर्याद दिली की, त्यांची डयुटी दौंड रेल्वे स्थानकावर होती. त्यावेळेस आरोपी दौंड रेल्वे स्थानकावर गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून प्रवास करीत असतांना मिळून आला. त्यानंतर त्यांनी आरोपीस पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. चौकशीअंती आरोपीने गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास केलेचे निष्पन्न झाले. म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १५५ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

**उलटतपास आरोपीने नाकारला.**

२. फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक :१५/१०/२०१८.**

<u>**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.**</u>

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र. १ | : | फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न क्र. २ | : | श्री. बी. पी. मीना (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दि. १५/१०/२०१८ रोजी तुम्ही गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास करीत असतांना मिळून आले. याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | हे खोटे आहे. |
| प्रश्न क्र. ३ | : | सदर साक्षीदार तुमचेविरूध्द का साक्ष देतात? |
| उत्तर | : | मला माहित नाही. |
| प्रश्न क्र. ४ | : | तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ? |
| उत्तर | : | नही. |
| प्रश्न क्र. ५ | : | तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ? |
| उत्तर | : | नाही. |
| प्रश्न क्र. ६ | : | सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय ? |
| उत्तर | : | नाही. |

**समक्ष,**

आरोपीची सही

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : १५/१०/२०१८.**

<u>**प्रमाणपत्र**</u>

वरील तपासणी माझे समक्ष ऐकणेत व घेणेत आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : १५/१०/२०१८.**

## — न्यायनिर्णय —

( पारित दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८. )

१) आरोपीवर, गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास केलेचा, आरोप ठेवणेत आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक १५/१०/२०१८ रोजी सकाळी सकाळी ६.०० वाजता दरम्यान आरोपी हा गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास करीत असतांना फिर्यादी श्री. व्ही. टी. जोगदंड, आर.पी.एफ. दौंड यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण (नि.क्र.२) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १५/१०/२०१८ रोजी सकाळी ६.०० वाजता आरोपी हा गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास करीत असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

### *का र ण मि मां सा*

५) **मुद्दा क्रमांक १ :—**

श्री. बी. पी. मीना (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक १५/१०/२०१८ रोजी दौंड स्थानकावर आरोपी गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास करीत असताना फिर्यादी श्री. व्ही. टी. जोगदंड यांना मिळून आला व त्यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी ३ नोंदवून घेतली. तसेच सदर साक्षीदाराने साक्षीमध्ये पुढे असे सांगितले की, त्यांच्या चौकशीमध्ये आरोपीने गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास करीत असलेचे निष्पन्न झाले. म्हणून त्यांनी सदरची फिर्याद दाखल केली. आरोपीने त्याची रेल्वे स्थानकावरील उपस्थिती नाकारलेली नाही. रेल्वे स्थानकाचे परिसरामध्ये नेमके कोणते कारणासाठी तो आलेला होता अगर त्याचेकडे प्लॅटफॉर्म तिकीट होते किंवा नव्हते या बाबतचे स्पष्टीकरण त्याने केलेले नाही. त्यामुळे त्याचेविरुध्द उलटविचार करणेस वाव मिळतो. तसेच फिर्यादी व चौकशी अधिकारी यांना आरोपीस खोट्या प्रकरणात गुंतविण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. तसेच फिर्यादी व आरोपीमध्ये कोणत्याही

प्रकारचे पूर्ववैमनस्य नाही. यावरुन चौकशी अधिका—याचे साक्षीवर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण आरोपीने अभिलेखावर आणलेले नाही. तसेच, आरोपीने साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने गाडी क्र. १२१३० च्या विकलांग बोगीतून अनाधिकृतरित्या प्रवास करुन कलम १५५ रेल्वे अधिनियमनुसार अपराध केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

६) **<u>मुद्दा क्रमांक २ः—</u>**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून त्याचा हा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केलेचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझे मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन सदर मुद्देचा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. आरोपी श्रीशैल विश्वनाथ दिगे याला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम २५५(२) अन्वये, रेल्वे अधिनियम १९८९, कलम १५५, खालील गुन्ह्याकरीता दोषी ठरविणेत येते आणि सदर गुन्ह्याकरीता त्यास दंड रुपये ५००/— (एकूण पाचशे रुपये फक्त) ठोठावण्यात येतो, दंडाची रक्कम न भरल्यास २ दिवसांची साधी कैद भोगण्याची आहे.

०२. वसूल झालेल्या दंडाच्या रक्कमेपैकी रक्कम रु. २,५०/— फौजदारी व्यवहार संहिता, कलम ३५७(१) अन्वये खर्च म्हणून रेल्वे खात्यास देण्यात यावी.

**दौंड.**
**दिनांकः १५/१०/२०१८.**

**( पी. डी. सावंत )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

” I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : S.K. Torane,
Court's Name : P. D. Sawant, J.M.F.C.Railway Court, Daund.
Date : 15.**10**.2018
Judgment signed by presiding officer on : 15.**10**.2018
Judgment uploaded on : 17.**10**.2018